Pudhari, 26/04/2026

# पणन मंडळाच्या आंबा महोत्सवात सहा कोटींची उलाढाल

- ६५ हजार डझन आंब्यांची विक्री पूर्ण
- पणनचे कार्यकारी संचालक संजय कदम यांची माहिती

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्य कृषी पणन मंडळाच्या शेतकरी ते थेट ग्राहक उपक्रमांतर्गत मार्केट यार्डात सुरू असलेल्या आंबा महोत्सवात सुमारे ६५ हजार डझन आंब्यांची विक्री होऊन सहा कोटी रुपयांची उलाढाल पूर्ण झाली आहे. आवक वाढल्यामुळे आता आंब्यांचे दर उतरले असून, प्रतिडझनाचा सरासरी दर ६०० ते १२०० रुपयांपर्यंत खाली आल्याची माहिती मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली. आंबा महोत्सव ३१ मेपर्यंत सुरू राहणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांकडून स्वतःच आंबा विक्री होत असल्याने ग्राहकांबरोबरची साखळी वाढत आहे. शिवाय मध्यस्थ टाळून थेट शेतकऱ्यांचा ग्राहकांबरोबर शेतमाल व्यापार वाढावा, हाच महोत्सवाचा उद्देश असल्याचे ते म्हणाले.

दरम्यान, आंबा बागायतदार शेतकरी अमित शिर्सेकर (राजापूर, जि. रत्नागिरी) म्हणाले, कोकणातून बाजारात सध्या दोन ते अडीच हजार पेट्यांइतकी आवक होत आहे. हापूस आंब्यांचे दर्जा व आकारमानानुसार प्रतिडझनाचे दर पुढीलप्रमाणे : (कंसात मागील आठवड्यातील दर) : नंबर १: १००० ते १२०० (१२००-१६००), नंबर २ : ८०० ते १००० (१०००-१२००), नंबर ३ : ६०० ते ७०० रुपये (८००-१०००).

## शेतकरी महोत्सवाबाहेरच अनधिकृत आंबा विक्री फोफावली

पणन मंडळ व जिल्हा परिषदेच्या संयुक्त मोहिमेतून मार्केट यार्डात आंबा विक्री होत आहे. मात्र, या आंबा महोत्सवाच्या प्रवेशद्वारावर दुतर्फा अनधिकृत आंबा विक्रेत्यांनी चांगलेच बस्तान बसविले असून, त्यांचा शेतकऱ्यांच्या आंबा विक्रीवर विपरीत परिणाम होत आहे. ग्राहक शेतकऱ्यांचाच आंबा समजून बाहेरच माल खरेदी करीत असल्याने दुपारनंतर आंबा महोत्सवातील ग्राहकांची संख्या रोडावते व आंबा विक्रीस खीळ बसत असल्याची शेतकऱ्यांची तक्रार आहे. मागील आठवड्यात पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रकाश जगताप यांच्या सूचनेनुसार प्रशासनाने कारवाई केली. परंतु, अनधिकृत विक्रेत्यांनी त्या कारवाईला केराची टोपली दाखवत बाजार समितीलाही ते जुमानत नसल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे कोट्यवधी रुपये खर्चून नेमण्यात आलेल्या समितीच्या सुरक्षायंत्रणेचे काम कुचकामी असल्याची टीका होत असून, बाजार समिती प्रशासन किती दिवस मूग गिळून गप्प बसणार? असा प्रश्न महोत्सवातील आंबा बागायतदार शेतकऱ्यांकडून उपस्थित करण्यात आला.

Agrowon, 26/04/2026

# सांगलीच्या दहा हजार टन द्राक्षांची परदेशात निर्यात

## युरोप, आखातासह बावीस देशांत ७४६ कंटेनरची पाठवणी

ॲग्रोवन वृत्तसेवा

**सांगली :** अतिवृष्टी व सततच्या पावसाच्या फटक्यांच्या पार्श्वभूमीवर यंदाच्या हंगामात आखाती देशांसह युरोपातील २२ देशांत तब्बल ७४६ कंटेनरमधून १० हजार १३५ टन द्राक्षांची निर्यात करण्यात आली असून, निर्यातीचा हंगाम आता आटोपला आहे.

जिल्ह्यातील ८ हजार ३५६ शेतकऱ्यांनी ४ हजार ४३५ हेक्टर क्षेत्रावरील द्राक्ष बागांची निर्यातीसाठी नोंदणी केली होती. गतवर्षीच्या नैसर्गिक संकटांच्या मालिकेमुळे नोंदणीत घट झाली होती. तरीही शेतकऱ्यांनी काटेकोर व्यवस्थापन करत बागा टिकवून निर्यातक्षम उत्पादन साधले.

पश्चिम आशियातील युद्धजन्य परिस्थितीमुळे आखाती देशांकडे होणारी निर्यात काहीशी संथ होती. मात्र, युरोपियन देशांमधील निर्यातीला चांगली गती मिळाली. एकूणच निर्यातीची गती मंद असली, तरीही जिल्ह्यातून १० हजार टनांहून अधिक द्राक्षे परदेशात पोहोचली. यासंदर्भात प्राप्त झालेल्या आकडेवारीनुसार, कुवेत, ओमान, कतार, सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिराती या देशांत १६४ कंटेनरमधून २,४७०.४२ टन द्राक्षांची निर्यात झाली. तर युरोपियन व इतर देशांत ५८२ कंटेनरमधून ७,६६५.१४ टन द्राक्षे पाठविण्यात आली. यामध्ये नेदरलँड्स येथे सर्वाधिक ३२७ कंटेनरमधून ४,३६९.४६ टन द्राक्षांची निर्यात झाली. मात्र, गतवर्षीच्या तुलनेत यंदा निर्यातीत मोठी घट नोंदवली गेली आहे. गेल्या हंगामात १७ हजार ८९७ टन निर्यात झाली होती, तर यंदा ती ७ हजार ७६२ टनांनी कमी झाली.



### द्राक्ष निर्यातीचा लेखाजोखा

एकूण निर्यात : **१०,१३५ टन**
कंटेनर संख्या : **७४६**
आयातदार देश : **२२**
सहभागी शेतकरी : **८,३५६**
नोंदणीकृत क्षेत्र : **४,४३५ हेक्टर**
आखाती देशांतील निर्यात : **२,४७० टन**
युरोपातील देशांतील निर्यात : **७,६६५ टन**

हिंदी साप्ताहिक

# स्वतंत्र भारत का मत

# किसानों को मजबूत बनाने की दिशा में महाराष्ट्र सरकार के बड़े कदम : विपणन मंत्री जयकुमार रावल

## अब दिल्ली में भी लगेगा आम महोत्सव, पुणे में 'आंबा महोत्सव-2026' का भव्य शुभारंभ

**पुणे।** 'फलों का राजा' आम अब सिर्फ स्वाद का नहीं, बल्कि किसानों की आय बढ़ाने और ग्रामीण अर्थव्यवस्था को मजबूत करने का बड़ा माध्यम बनता जा रहा है। महाराष्ट्र सरकार इसी दिशा में लगातार प्रयास कर रही है। राज्य के विपणन मंत्री जयकुमार रावल ने घोषणा की है कि आने वाले समय में देश की राजधानी नई दिल्ली में भी भव्य आम महोत्सव आयोजित किया जाएगा, जिससे किसानों को बड़े बाजार उपलब्ध हो सकें। पुणे के मार्केट यार्ड में महाराष्ट्र राज्य कृषि विपणन मंडल और पुणे जिला परिषद की ओर से आयोजित 'आंबा महोत्सव-2026' के उद्घाटन समारोह में बोल रहे थे। 'फार्म टू कस्टमर' मॉडल बना किसानों के लिए वरदान मंत्री रावल ने कहा कि साल 2001 में शुरू हुई 'उत्पादक से ग्राहक तक सीधे बिक्री' की पहल आज एक मजबूत व्यवस्था बन चुकी है। देवगढ़ के आम उत्पादक सहकारी संस्थान और महामैंगो के सहयोग से शुरू हुआ यह प्रयोग अब राज्यभर में सफल मॉडल बन गया है। उन्होंने बताया कि इस वर्ष महोत्सव रजत जयंती वर्ष में प्रवेश कर चुका है, जो इसकी लोकप्रियता और सफलता को दर्शाता है। 40 दिन तक चलेगा महोत्सव, 60 स्टॉल; लक्ष्य 150 स्टॉल इस साल का आम महोत्सव करीब 40 दिनों तक चलेगा, जिसमें अभी 60 स्टॉल लगाए गए हैं। हर स्टॉल पर दो किसान सीधे आम बेच रहे हैं। भविष्य में इसे बढ़ाकर 150 स्टॉल तक पहुंचाने की योजना है, ताकि ज्यादा से ज्यादा किसानों को मंच मिल सके। GI टैग वाला हापुस बना आकर्षण का केंद्र महोत्सव में कोकण क्षेत्र के पांच जिलों—ठाणे, पालघर, रायगढ़, रत्नागिरी, और सिंधुदुर्ग, से आए GI टैग प्राप्त हापुस आम खास आकर्षण हैं। इसके अलावा केसर, पायरी, और अन्य किस्मों के आम भी उपलब्ध हैं। GI टैग की वजह से ग्राहकों को असली हापुस की पहचान आसानी से हो रही है और फर्जीवाड़े पर रोक लग रही है।



### QR कोड और 'Know Your Farmer' से बढ़ेगा भरोसा

बदलते समय के साथ तकनीक का इस्तेमाल भी बढ़ाया गया है। आम पर QR कोड लगाया जा रहा है 'Know Your Farmer (KYF)' पहल के तहत ग्राहक सीधे किसान की जानकारी देख सकते हैं इससे पारदर्शिता बढ़ेगी और ग्राहकों का भरोसा मजबूत होगा। मध्यस्थ कम, किसानों को सीधा फायदा इस महोत्सव का मुख्य उद्देश्य है: किसान से ग्राहक तक सीधी बिक्री बढ़ाना बिचौलियों की भूमिका कम करना किसानों को उचित मूल्य दिलाना इससे किसानों को बेहतर आय मिल रही है, वहीं ग्राहकों को भी उचित कीमत पर गुणवत्ता वाला, प्राकृतिक तरीके से पका आम मिल रहा है सरकार की नई रणनीति: महोत्सवों के जरिए मार्केटिंग मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस के मार्गदर्शन में राज्य में मिलेट महोत्सव - संतरा महोत्सव काजू-बेदाना महोत्सव आम महोत्सव जैसे आयोजन किए जा रहे हैं। इन कार्यक्रमों में किसान उत्पादक कंपनियां, सहकारी संस्थाएं और महिला स्वयं सहायता समूह सक्रिय भूमिका निभा रहे हैं। देशभर में बाजारों का अध्ययन, निर्यात पर फोकस कृषि उत्पादों के व्यापार को बढ़ाने के लिए अधिकारियों के अध्ययन दौरे भी आयोजित किए जाएंगे। ये दौरे राजस्थान, गुजरात, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, पश्चिम बंगाल, तेलंगाना, कर्नाटक, तमिलनाडु और केरल जैसे राज्यों में होंगे। 'मैग्नेट प्रोजेक्ट' से बनेगी मजबूत सप्लाई चेन राज्य में 'मैग्नेट प्रोजेक्ट' के जरिए फलों, सब्जियों और फूलों की वैल्यू चेन को मजबूत किया जा रहा है। साथ ही महाराष्ट्र में दुनिया की सबसे बड़ी कृषि उपज मंडी विकसित करने की योजना है, जिसे समुद्र, रेल, हवाई अड्डे और हाईवे से जोड़ा जाएगा।

### कोकण में 1.70 लाख हेक्टेयर में आम उत्पादन

कोकण क्षेत्र में करीब 1.70 लाख हेक्टेयर क्षेत्र में आम की खेती होती है। हापुस आम अपनी खुशबू, स्वाद और गुणवत्ताकेकारणदुनियाभरमेंमशहूरहै। वहीं लातूर, बीड, अहिल्यानगर, नासिक और सोलापुर में केसर आम का उत्पादन बढ़ रहा है। पिछले साल 225 करोड़ का कारोबार मंडल के कार्यकारी संचालक संजय कदम के अनुसार: पिछले साल 34 लाख दर्जन आम की बिक्री हुई करीब 225 करोड़ रुपए का कारोबार हुआ इस साल यह आंकड़ा और बढ़ने की उम्मीद है। मंत्री ने लोगों से अपील किया है कि आम सीधे किसानों से खरीदें मंडल के सभापति प्रकाश जगताप ने लोगों से अपील की है कि वे महोत्सव में आकर सीधे किसानों से आम खरीदें, जिससे किसानों को अधिक लाभ मिल सके। उद्घाटन के बाद मंत्री ने किया निरीक्षण कार्यक्रम के बाद मंत्री जयकुमार रावल ने स्टॉल का दौरा किया और किसानों से बातचीत कर उनकी समस्याएं सुनीं। आंबा महोत्सव अब सिर्फ एक बाजार नहीं, बल्कि किसानों और ग्राहकों के बीच विश्वास का मजबूत सेतु बन चुका है। आधुनिक तकनीक, सीधी बिक्री और नए बाजारों के जरिए महाराष्ट्र सरकार ग्रामीण अर्थव्यवस्था को नई दिशा देने की कोशिश कर रही है।

# शेतकरी आणि ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम करण्याच्या दिशेने राज्य शासन प्रयत्नशील-पणनमंत्री जयकुमार रावल



**पुणे :** 'फळांचा राजा' म्हणून ओळखला जाणारा आंबा हा सर्वांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे, त्यामुळे महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या माध्यमातून येत्या काळात महाराष्ट्राची राजधानी आणि देशाची राजधानी नवी दिल्ली येथे आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात येईल, याकरीता शेतकऱ्यांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल. एकूणच राज्याचा शेतकरी आणि ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम करण्याच्या दिशेने राज्य शासन प्रयत्नशील आहे, असे प्रतिपादन राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी केले.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ आणि पुणे जिल्हा परिषदेच्यावतीने मार्केट यार्ड येथे आयोजित 'आंबा महोत्सव-२०२६' च्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे सभापती प्रकाश जगताप, कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे आदी उपस्थित होते.

श्री. रावल म्हणाले, सन २००१ मध्ये महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या कार्यालय आवारात देवगड तालुका आंबा उत्पादक सहकारी संस्था, देवगड आणि महामँगो यांच्या माध्यमातून सुरू झालेली उत्पादक ते ग्राहक थेट आंबा विक्रीची संकल्पना आज एका मोठ्या वटवृक्षात रूपांतरित झालेली आहे. अनेक वर्षाची परंपरा असलेल्या या आंबा महोत्सवाच्या माध्यमातून अनेक बदल टप्प्याने बदल करुन या वर्षी रौप्यमहोत्सवी वर्ष साजरे करीत आहेत.

यावर्षीचा महोत्सव सुमारे ४० दिवस सुरू राहणार असून यामध्ये एकूण ६० स्टॉल असून प्रत्येक दोन शेतकरी आंबा विक्री करीत आहे. येत्या काळात पणन मंडळाच्यावतीने सुमारे १५० स्टॉल उभे करण्याचा प्रयत्न आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून शेतकरी आपला आंबा थेट ग्राहकांना विकून कायमची शृखंला निर्माण करण्यासाठी प्रयत्न करतो आणि शेतकरी आणि ग्राहक यांच्यामध्ये कायमचे संबंध निर्माण झाल्याचे दिसून येत आहे.

# शेतकरी आणि ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम करण्याच्या दिशेने राज्य शासन प्रयत्नशील-पणनमंत्री जयकुमार रावल



**पुणे :** 'फळांचा राजा' म्हणून ओळखला जाणारा आंबा हा सर्वांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे, त्यामुळे महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या माध्यमातून येत्या काळात महाराष्ट्राची राजधानी आणि देशाची राजधानी नवी दिल्ली येथे आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात येईल, याकरीता शेतकऱ्यांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल. एकूणच राज्याचा शेतकरी आणि ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम करण्याच्या दिशेने राज्य शासन प्रयत्नशील आहे, असे प्रतिपादन राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी केले.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ आणि पुणे जिल्हा परिषदेच्यावतीने मार्केट यार्ड येथे आयोजित 'आंबा महोत्सव–२०२६' च्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे सभापती प्रकाश जगताप, कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे आदी उपस्थित होते.

श्री. रावल म्हणाले, सन २००१ मध्ये महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या कार्यालय आवारात देवगड तालुका आंबा उत्पादक सहकारी संस्था, देवगड आणि महामँगो यांच्या माध्यमातून सुरू झालेली उत्पादक ते ग्राहक थेट आंबा विक्रीची संकल्पना आज एका मोठ्या वटवृक्षात रूपांतरित झालेली आहे. अनेक वर्षाची परंपरा असलेल्या या आंबा महोत्सवाच्या माध्यमातून अनेक बदल टप्प्याने बदल करुन या वर्षी रौप्यमहोत्सवी वर्ष साजरे करीत आहेत.

यावर्षीचा महोत्सव सुमारे ४० दिवस सुरू राहणार असून यामध्ये एकूण ६० स्टॉल असून प्रत्येक दोन शेतकरी आंबा विक्री करीत आहे. येत्या काळात पणन मंडळाच्यावतीने सुमारे १५० स्टॉल उभे करण्याचा प्रयत्न आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून शेतकरी आपला आंबा थेट ग्राहकांना विकून कायमची शृखंला निर्माण करण्यासाठी प्रयत्न करतो आणि शेतकरी आणि ग्राहक यांच्यामध्ये कायमचे संबंध निर्माण झाल्याचे दिसून येत आहे.

महोत्सवात कोकणातील पाच जिल्ह्यांमधील भौगोलिक मानांकन प्राप्त हापूस आंबा तसेच राज्यातील केशर, पायरी आणि इतर विविध वाणांचे आंबे उपलब्ध होणार आहेत. शेतकऱ्यांना हापूस आंब्यासाठी जीआय मानांकन मिळाले आहे.भौगोलिक मानांकनामुळे अस्सल हापूस ओळखता येतो व फसवणूक कमी होते. बदल्या काळानुसार 'क्यूआर कोड 'च्यामाध्यमातून आंबा फळाला नव्याने ओळख करुन देण्याचा प्रयत्न आहे. त्याचबरोबर 'नो युवर फार्मर' (एनयुएफ) ही संकल्पनेच्या माध्यमातून ग्राहकांना थेट शेतकऱ्यांची माहिती मिळणार आहे, ज्यामुळे विश्वासार्हता अधिक वाढेल.

# शेतकरी आणि ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम करण्याच्या दिशेने राज्य शासन प्रयत्नशील : पणनमंत्री जयकुमार रावल

**पुणे :** 'फळांचा राजा' म्हणून ओळखला जाणारा आंबा हा सर्वांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे, त्यामुळे महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या माध्यमातून येत्या काळात महाराष्ट्राची राजधानी आणि देशाची राजधानी नवी दिल्ली येथे आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात येईल, याकरीता शेतकऱ्यांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल. एकूणच राज्याचा शेतकरी आणि ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम करण्याच्या दिशेने राज्य शासन प्रयत्नशील आहे, असे प्रतिपादन राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी केले.



महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ आणि पुणे जिल्हा परिषदेच्यावतीने मार्केट यार्ड येथे आयोजित 'आंबा महोत्सव-२०२६' च्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे सभापती प्रकाश जगताप, कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे आदी उपस्थित होते.

श्री. रावल म्हणाले, सन २००१ मध्ये महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या कार्यालय आवारात देवगड तालुका आंबा उत्पादक सहकारी संस्था, देवगड आणि महामँगो यांच्या माध्यमातून सुरू झालेली उत्पादक ते ग्राहक थेट आंबा विक्रीची संकल्पना आज एका मोठ्या वटवृक्षात रूपांतरित झालेली आहे. अनेक वर्षाची परंपरा असलेल्या या आंबा महोत्सवाच्या माध्यमातून अनेक बदल टप्प्याने बदल करुन या वर्षी रौप्यमहोत्सवी वर्ष साजरे करीत आहेत.

यावर्षीचा महोत्सव सुमारे ४० दिवस सुरू राहणार असून यामध्ये एकूण ६० स्टॉल असून प्रत्येक दोन शेतकरी आंबा विक्री करीत आहे. येत्या काळात पणन मंडळाच्यावतीने सुमारे १५० स्टॉल उभे करण्याचा प्रयत्न आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून शेतकरी आपला आंबा थेट ग्राहकांना विकून कायमची शृखंला निर्माण करण्यासाठी प्रयत्न करतो आणि शेतकरी आणि ग्राहक यांच्यामध्ये कायमचे संबंध निर्माण झाल्याचे दिसून येत आहे.

महोत्सवात कोकणातील पाच जिल्ह्यांमधील भौगोलिक मानांकन प्राप्त हापूस आंबा तसेच राज्यातील केशर, पायरी आणि इतर विविध वाणांचे आंबे उपलब्ध होणार आहेत. शेतकऱ्यांना हापूस आंब्यासाठी जीआय मानांकन मिळाले आहे.भौगोलिक मानांकनामुळे अस्सल हापूस ओळखता येतो व फसवणूक कमी होते.

बदल्या काळानुसार 'क्यूआर कोड'च्यामाध्यमातून आंबा फळाला नव्याने ओळख करुन देण्याचा प्रयत्न आहे. त्याचबरोबर 'नो युवर फार्मर' (एनयुएफ) ही संकल्पनेच्या माध्यमातून ग्राहकांना थेट शेतकऱ्यांची माहिती मिळणार आहे, ज्यामुळे विश्वासार्हता अधिक वाढेल. आगामी काळात समाज माध्यमाचा प्रभावीपणे वापर करुन मोठ्या प्रमाणात या महोत्सवाचे मार्केटिंग करण्यात येणार आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी पणन मंडळाच्या माध्यमातून राज्यात उत्पादकांना थेट ग्राहकांशी जोडण्याच्या उद्देशाने मिलेट महोत्सव, संत्रा महोत्सव, आंबा महोत्सव, काजू-बेदाणा महोत्सव अशा विविध महोत्सवांचे आयोजन करण्यात येते. या उपक्रमांमध्ये शेतकरी उत्पादक कंपन्या, सहकारी संस्था, पणन संस्था, महिला आर्थिक विकास महामंडळाच्या सीएमआरसी तसेच महिला बचत गटांचा सक्रिय सहभाग असतो.

आंबा महोत्सवाचा उद्देश शेतकरी आणि ग्राहक या दोघांचे हित साधणारा आहे, शेतकरी ते ग्राहक थेट विक्री वाढवणे, मध्यस्थ कमी करणे आणि आंबा उत्पादकांना थेट ग्राहक उपलब्ध करून देणे.मध्यस्थांना वगळून शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव आणि ग्राहकांना रास्त दरात उत्तम, दर्जेदार, नैसर्गिक पद्धतीने पिकवलेले, भौगोलिक मानांकन असलेले आंबे या महोत्सवामुळे मिळतात. उष्णकटिबंधीय व उपोष्णकटिबंधीय हवामानामुळे आपल्या देशात आंब्याच्या लागवडीसाठी अत्यंत अनुकूल परिस्थिती आहे.कोकणातील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये सुमारे १ लाख ७० हजार हेक्टर क्षेत्रावर आंब्याचे उत्पादन घेतले जाते.

हापूस आंबा त्याच्या चव, सुगंध आणि गुणवत्तेसाठी जगभर प्रसिद्ध आहे. तसेच लातूर, बीड, अहिल्यानगर, नाशिक, सोलापूर या भागात केशर आंबा उत्पादन घेण्यात येत आहे. शेतकऱ्यांचा मालाला अधिकाधिक भाव मिळून त्याची आर्थिक स्थर्यता मिळू शकेल. आंतरराष्ट्रीय तसेच देशांतर्गत व्यापार वृद्धीसाठीही पणन मंडळाच्या माध्यमातून दिल्ली, राजस्थान, गुजरात, उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, पश्चिम बंगाल, तेलंगणा, कर्नाटक, तामिळनाडू आणि केरळ या राज्यांमध्ये अधिकाऱ्यांचा अभ्यास दौरा आयोजित करण्यात येणार आहे. या दौऱ्याचा उद्देश देशातील महत्त्वाच्या बाजारपेठांचा अभ्यास करणे, विविध राज्यांमध्ये शेतमाल विक्री व्यवस्थेत राबविण्यात येणाऱ्या नवकल्पनांची माहिती घेणे तसेच कृषी उत्पन्न बाजार समित्या, व्यापारी, निर्यातदार आणि प्रक्रिया उद्योग यांच्याशी संबंधित माहिती संकलित करणे हा आहे.

# राज्य सरकार किसानों और ग्रामीण अर्थव्यवस्था को मजबूत बनाने की कोशिश कर रही है–पणन मंत्री जयकुमार रावल



**पुणे :** 'फलों का राजा' कहा जाने वाला आम हर किसी की दिलचस्पी का विषय है, इसलिए आने वाले दिनों में महाराष्ट्र राज्य कृषि मार्केटिंग बोर्ड के ज़रिए महाराष्ट्र और देश की राजधानी नई दिल्ली में मैंगो फेस्टिवल का आयोजन किया जाएगा, जिससे किसानों को ज़्यादा से ज़्यादा सुविधाएँ दी जाएँगी। कुल मिलाकर, राज्य सरकार राज्य के किसानों और ग्रामीण अर्थव्यवस्था को मज़बूत बनाने की कोशिश कर रही है, ऐसा राज्य के मार्केटिंग मंत्री जयकुमार रावल ने कहा।

महाराष्ट्र राज्य कृषि मार्केटिंग बोर्ड और पुणे ज़िला परिषद द्वारा मार्केट यार्ड में आयोजित 'मैंगो फेस्टिवल–२०२६' के उद्घाटन के मौके पर बोल रहे थे। इस मौके पर महाराष्ट्र राज्य कृषि मार्केटिंग बोर्ड के चेयरमैन प्रकाश जगताप, एग्जीक्यूटिव डायरेक्टर संजय कदम, जनरल मैनेजर विनायक कोकरे और अन्य लोग मौजूद थे। श्री. रावल ने कहा, प्रोड्यूसर से कस्टमर तक सीधे आम बेचने का जो कॉन्सेप्ट २००१ में महाराष्ट्र स्टेट एग्रीकल्चरल मार्केटिंग बोर्ड के ऑफिस में देवगढ़ तालुका मैंगो प्रोड्यूसर्स कोऑपरेटिव सोसाइटी, देवगढ़ और महामैंगो के ज़रिए शुरू किया गया था, वह आज एक बड़े बरगद के पेड़ में बदल गया है। कई सालों की परंपरा वाला यह आम फेस्टिवल इस साल कई बदलाव करके अपनी सिल्वर जुबली मना रहा है।

इस साल का फेस्टिवल करीब ४० दिनों तक चलेगा और इसमें कुल ६० स्टॉल हैं, जिनमें दो–दो किसान आम बेच रहे हैं। मार्केटिंग बोर्ड आने वाले दिनों में करीब १५० स्टॉल लगाने की कोशिश कर रहा है।

Sakal, 12/04/2026

# जगातील सर्वांत मोठी बाजार समिती उभारणार

## पणनमंत्री जयकुमार रावल यांची घोषणा; पुण्यात आंबा महोत्सवाचे उद्‌घाटन

**पुणे, ता. ११ :** राज्यात फळे, भाजीपाला व फुलांच्या विक्रीसाठी 'मॅग्नेट' प्रकल्पातून आधुनिक साखळी उभारली जात आहे. याच अंतर्गत जल, रेल्वे, विमान व महामार्गांशी जोडलेली जगातील सर्वांत मोठी कृषी उत्पन्न बाजार समिती राज्यात उभारणार असल्याची घोषणा पणनमंत्री जयकुमार रावल यांनी केली.

मार्केट यार्डात महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ व पुणे जिल्हा परिषद आयोजित 'आंबा महोत्सव २०२६'च्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. या वेळी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे, संचालक शरद जरे, पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रकाश जगताप, उपसभापती शशिकांत गायकवाड व सचिव डॉ. राजाराम धोंडकर उपस्थित होते.



**मार्केट यार्ड, पुणे :** पणन मंडळाच्या आंबा महोत्सवाचे उद्‌घाटन पणनमंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते झाले. या वेळी मान्यवर.

रावल म्हणाले, ''देवगड तालुका आंबा उत्पादक सहकारी संस्था व महामँगोच्या माध्यमातून 'शेतकरी ते ग्राहक' थेट विक्री संकल्पना राबवली जात आहे. गेल्या २५ वर्षांपासूनच्या या महोत्सवामुळे ग्राहक-शेतकरी नाते दृढ झाले आहे. आगामी काळात मुंबई व दिल्लीतही असे महोत्सव होतील.''

महोत्सवात हापूस, केशर, पायरीसह विविध जाती उपलब्ध असून भौगोलिक मानांकनामुळे (जीआय टॅग) ग्राहकांची फसवणूक थांबेल, असेही त्यांनी नमूद केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली विविध महोत्सवांतून शेतकऱ्यांना थेट बाजारपेठ दिली जात असल्याचे त्यांनी सांगितले.

आंबा विक्रीत क्यूआर कोडचा वापर होणार असून ग्राहकांना थेट शेतकऱ्याची माहिती मिळेल. खराब फळ मिळाल्यास ते बदलून देण्याची सुविधाही उपलब्ध असेल, असे रावल यांनी सांगितले. राज्यातील बारदाना टंचाईबाबत केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्याशी चर्चा झाली आहे. नाफेडमार्फत यावर तातडीने तोडगा काढला जाईल, असेही रावल यांनी स्पष्ट केले.

### चौकशीबाबत स्पष्ट भूमिका

- पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चौकशी अहवालाचे परीक्षण होईल. पारदर्शकतेचा अभाव आढळल्यास पुनर्चौकशी केली जाईल, असे मंत्री रावल यांनी स्पष्ट केले.

Pudhari, 12/04/2026

# जगातील सर्वांत मोठी बाजार समिती उभारणार

## केळी क्लस्टर, कांदा प्रक्रिया योजना आणणार; पणनमंत्री जयकुमार रावल यांचे सुतोवाच

- पणन मंडळ कर्मचाऱ्यांनी कार्यालय सोडून फिल्डरवर काम करण्यासाठी टास्क फोर्स

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्यात जगातील सर्वात मोठी कृषी उत्पन्न बाजार समिती उभारण्यात येणार असून, ती समुद्र, रेल्वे, विमानतळ आणि महामार्गाद्वारे जोडली जाणार आहे. त्यासाठी जागा निश्चित केली असून, शेतकऱ्यांचा माल बांधापासून ते ग्राहकांपर्यंत पोहोचण्यासाठी जलद पुरवठा साखळी विकसित करण्याचा आमचा प्रयत्न आहे. तसेच केळीचे क्लस्टर निर्मिती आणि कांदा प्रक्रिया योजना लवकरच आणणार असल्याचे सूतोवाच राज्याचे पणनमंत्री जयकुमार रावल यांनी येथे केले. पणन मंडळाच्या पुढाकाराने लवकरच मुंबई आणि देशाची राजधानी नवी दिल्लीतही आंबा महोत्सव आयोजन करण्यात येत आहे.



**आंबा महोत्सवाच्या उद्घाटनानंतर पणनमंत्री जयकुमार रावल, पुणे बाजार समितीचे सभापती प्रकाश जगताप व उपस्थित अन्य मान्यवर.**


महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ आणि पुणे जिल्हा परिषदेच्या वतीने मार्केट यार्ड येथील पीएमटीच्या शेवटच्या बसथांब्याजवळील मैदानात कोकणातील आंब्यांची उपलब्धता असलेला शेतकरी ते थेट ग्राहक योजनेतंर्गत "आंबा महोत्सव-२०२६" च्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यंदाचे महोत्सवाचे २५ वे वर्ष आहे. या वेळी पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रकाश जगताप, उपसभापती शशिकांत गायकवाड, मिलिंद हरगुडे, राज्याचे पणन संचालक शरद जरे, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे सह व्यवस्थापकीय संचालक दीपक शिंदे, बाजार समितीचे सचिव राजाराम धोंडकर उपस्थित होते.

रावल म्हणाले, शेतमालाच्या निर्यातीबरोबरच देशांतर्गत बाजारपेठ काबीज करण्यासाठी पणन मंडळाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी कार्यालय सोडून फिल्डवर काम करण्यासाठी एक टास्क फोर्स तयार करण्यात येत आहे. ज्याद्वारे अन्य राज्यांतील नवीन ग्राहकांचा शोध घेऊन महाराष्ट्रातील शेतमालाची ब्रॅण्डिंगद्वारे विक्री करण्याचे नियोजन आहे. जीआय मानांकनामुळे अस्सल हापूस ओळखता येतो व फसवूणक टळते. बदलत्या काळानुसार "क्यूआर कोड"च्या माध्यमातून आंब्याला नव्याने ओळख करून देण्याचा प्रयत्न असून, ग्राहकांना थेट शेतकऱ्यांची माहिती मिळणार आहे.

या वेळी प्रकाश जगताप यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रास्तविक संजय कदम यांनी केले, तर आभार विनायक कोकरे यांनी मानले.

# जागतिक पातळीवरची बाजार समिती राज्यात निर्माण करणार

## पणन मंत्री जयकुमार रावल यांची घोषणा



**पुणे** : 'राज्य शासनाच्या 'मॅग्नेट' प्रकल्पाच्या माध्यमातून फळे, भाजीपाला, फुलांच्या विक्रीसाठी एक साखळी निर्माण करण्यात येणार आहे. जागतिक पातळीवर सर्वात मोठी कृषी उत्पन्न बाजार समिती राज्यात निर्माण करण्यात येणार आहे. जल, रेल्वे, वाहतूक, विमानतळ, तसेच महामार्गांशी ही बाजारपेठ जोडण्यात येणार आहे, अशी माहिती पणन मंत्री जयकुमार रावल यांनी शनिवारी दिली.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ आणि पुणे जिल्हा परिषदेकडून मार्केट यार्ड येथे 'आंबा महोत्सव' चे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाचे उद्घाटन रावल यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक विनायक कोकरे, संचालक शरद जरे, पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रकाश जगताप यावेळी उपस्थित होते.

हरभरा उत्पादक शेतकऱ्यांना बारदाणाचा तुटवडा जाणवत आहे. तशी त्यांची तक्रार आहे, त्या तक्रारीची दखल घेण्यात आली आहे. याबाबत केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्याशी चर्चा करण्यात आली आहे. 'नाफेड'च्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या तक्रारी सोडविण्यासाठी पाठपुरावा करण्यात येणार आहे. राज्य शासनाच्या 'मॅग्नेट' प्रकल्पाच्या माध्यमातून फळे, भाजीपाला, फुले विक्रीची शृंखला निर्माण करण्यात येणार आहे. पणन मंडळाकडून मिलेट महोत्सव, आंबा महोत्सव, काजू , बेदाणे महोत्सव अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे, असेही रावल यांनी सांगितले. संजय कदम यांनी प्रास्ताविक केले. विनायक कोकरे यांनी आभार मानले.

### आंबा विक्रीत क्यूआर कोडचा वापर

'आंबा विक्री व्यवहारात क्यूआर कोडचा वापर करण्यात येणार आहे. या माध्यमातून ग्राहकांना ग्राहकांना थेट आंबा उत्पादक शेतकऱ्याची माहिती मिळणार आहे. एखादे फळ खराब मिळाले तर त्याचा पाठपुरावा करणे ग्राहकाला शक्य होईल. ग्राहकांना हे फळही बदलून देण्यात येईल, असे जयकुमार रावल यांनी सांगितले.

### अहवालाचा अभ्यास करुन चौकशी

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चौकशी अहवालाचे अवलोकन करण्यात येणार आहे. या प्रकरणात अधिकाऱ्यांनी चौकशी पारदर्शकपणे केली नसल्याचे स्पष्ट झाल्यास पुन्हा चौकशी करण्यात येणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार) संघटक विकास लवांडे यांनी बाजार समितीत गैरव्यवहार झाल्याचे आरोप केले होते. चौकशी पारदर्शक पद्धतीने करण्यात आली नाही, असे आरोप लवांडे यांनी केले होते.

# पणन मंडळामार्फत आंबा महोत्सवाचे पुण्यात आयोजन

**पुणे :** महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ व पुणे जिल्हा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' या संकल्पनेअंतर्गत पीएमटी बस डेपो शेजारी मार्केटयार्ड, पुणे येथे आंबा महोत्सव–२०२६ चे आयोजन करण्यात आले आहे.

या महोत्सवाचे उद्‌घाटन राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते ११ एप्रिल रोजी दुपारी १ वाजता करण्यात येणार आहे. या महोत्सवात रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, पालघर व ठाणे या कोकणातील जिल्ह्यांमधील जीआय मानांकन प्राप्त हापूस आंब्यासह केशर, पायरी व इतर वाणांचे आंबे उपलब्ध असणार आहेत.

मार्केटयार्ड येथे सुमारे ६० स्टॉल्सद्वारे थेट विक्रीची व्यवस्था करण्यात आली असून शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना दर्जेदार आंबे वाजवी दरात मिळण्याचा उद्देश आहे.

हा आंबा महोत्सव सलग २५ व्या वर्षी आयोजित करण्यात येत असून १० जून २०२६ पर्यंत सुरू राहणार आहे. ग्राहकांनी या महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन पणन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांनी केले आहे.

Sakal, 11/04/2026

# पुण्यात आजपासून ‘आंबा महोत्सव’

**मार्केट यार्ड, ता. १० :** महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत ‘उत्पादक ते ग्राहक थेट विक्री’ या संकल्पनेअंतर्गत पुण्यातील मार्केट यार्ड पीएमटी बस डेपो शेजारी ‘आंबा महोत्सव-२०२६’चे आयोजन केले आहे. आंबा महोत्सवाचे उद्घाटन शनिवारी (ता. ११) दुपारी १ वाजता पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते होणार आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही शेतकऱ्यांना थेट ग्राहकांपर्यंत हापूस आंबा पोहोचविण्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. मध्यस्थांची साखळी टाळून शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव मिळावा आणि ग्राहकांना दर्जेदार आंबा रास्त दरात उपलब्ध व्हावा, हा या महोत्सवामागील प्रमुख उद्देश आहे. विशेष म्हणजे, यंदा या उपक्रमाचे सलग २५ वे वर्ष आहे.

महोत्सवात रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, पालघर आणि ठाणे या कोकणातील जिल्ह्यांमधील भौगोलिक मानांकन (जीआय) प्राप्त हापूस आंब्यासह राज्यातील केशर, पायरी आणि इतर विविध वाणांचा आंबा विक्रीसाठी उपलब्ध राहणार आहे. शेतकरी आणि नवउद्योजकांना त्यांच्या उत्पादनांची प्रसिद्धी, ग्राहकांशी थेट संपर्क आणि बाजारपेठ निर्माण करण्यासाठी हा मंच उपयुक्त ठरणार असल्याची माहिती कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली.

> मार्केट यार्ड येथे सुमारे ६० स्टॉल्सच्या माध्यमातून आंब्याची विक्री व्यवस्था केली असून, शहरातील ग्राहकांना एकाच ठिकाणी विविध प्रकारच्या आंब्यांची खरेदी करता येणार आहे. उच्चप्रतीच्या कोकणी हापुसासह विविध वाणांचा लाभ नागरिकांनी घ्यावा.
>
> **- विनायक कोकरे**, सरव्यवस्थापक

# पणन मंडळामार्फत आंबा महोत्सवाचे पुण्यात आयोजन

**पुणे :** महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ व पुणे जिल्हा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' या संकल्पनेअंतर्गत पीएमटी बस डेपो शेजारी मार्केटयार्ड, पुणे येथे आंबा महोत्सव–२०२६ चे आयोजन करण्यात आले आहे.

या महोत्सवाचे उद्घाटन राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते ११ एप्रिल रोजी दुपारी १ वाजता करण्यात येणार आहे. या महोत्सवात रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, पालघर व ठाणे या कोकणातील जिल्ह्यांमधील जीआय मानांकन प्राप्त हापूस आंब्यासह केशर, पायरी व इतर वाणांचे आंबे उपलब्ध असणार आहेत.

मार्केटयार्ड येथे सुमारे ६० स्टॉल्सद्वारे थेट विक्रीची व्यवस्था करण्यात आली असून शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना दर्जेदार आंबे वाजवी दरात मिळण्याचा उद्देश आहे.

हा आंबा महोत्सव सलग २५ व्या वर्षी आयोजित करण्यात येत असून १० जून २०२६ पर्यंत सुरू राहणार आहे. ग्राहकांनी या महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन पणन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांनी केले आहे.

# पणन मंडळाकडून आंबा महोत्सवाचे आयोजन

**पुणे** : महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ व पुणे जिल्हा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' या संकल्पनेअंतर्गत आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. मार्केटयार्ड येथील पीएमटी बस डेपोशेजारी ११ एप्रिल रोजी दुपारी एक वाजता या महोत्सवाचे उद्घाटन राज्याचे पणनमंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते होणार आहे. या महोत्सवात रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, पालघर व ठाणे या कोकणातील जिल्ह्यांमधील जीआय मानांकन प्राप्त हापूस आंब्यासह केशर, पायरी व इतर वाणांचे आंबे उपलब्ध असणार आहेत. मार्केटयार्ड येथे सुमारे ६० स्टॉल्स त्यासाठी असणार आहेत. सलग २५व्या वर्षी हा आंबा महोत्सव आयोजित करण्यात येत आहे. हा महोत्सव १० जूनपर्यंत सुरू राहणार आहे. ग्राहकांनी या महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन पणन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांनी केले आहे.

Pudhari, 11/04/2026

# पणनमंत्री रावल यांच्या हस्ते आज आंबा महोत्सवाचे उद्घाटन

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ व पुणे जिल्हा परिषदेच्या संयुक्त विद्यमाने 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' या संकल्पनेअंतर्गत मार्केट यार्डातील पीएमटी बस डेपोशेजारील मैदानात आंबा महोत्सव-२०२६ चे दिनांक १० एप्रिलपासून आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाचे उद्घाटन राज्याचे पणनमंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते शनिवारी (दि. ११) दुपारी एक वाजता होणार असल्याची माहिती पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली. पणन मंडळाकडून आंबा महोत्सव सलग २५ व्या वर्षी आयोजित करण्यात आला आहे.

महोत्सवामध्ये रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, पालघर आणि ठाणे या कोकणातील पाच जिल्ह्यातील भोगोलिक मानांकन (जीआय) मिळालेला हापूस आंबा तसेच राज्यातील केशर, पायरी तसेच इतर वाणांचा आंबा उपलब्ध होणार आहे. मार्केट यार्ड येथे सुमारे ६० स्टॉल्सद्वारे शेतकऱ्यांकडून थेट आंबा विक्रीची व्यवस्था करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना दर्जेदार आंबे वाजवी दरात मिळण्याचा उद्देश आहे. आंबा महोत्सव दिनांक १० जून २०२६ पर्यंत सुरू राहणार असल्याने ग्राहकांनी येथे आंबा खरेदीस प्राधान्य देण्याचे अवाहनही पणन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांनी केले आहे.



**सहकुटुंब चिमकुल्यांसह आंबा खरेदीस प्राधान्य दिले जात आहे.**

**प्रतिडझन १ हजार ते सोळाशे रुपये दर**

पणन मंडळाच्या आंबा महोत्सवात स्वतः कोकणातील बागायतदार शेतकऱ्यांकडून ग्राहकांना स्वतः आंबा विक्री केली जाते. आंब्यांचा आकारमान व वजनानुसार २०० ते २२५ ग्रॅम वजनाचे फळ असलेल्या आंब्यांची विक्री प्रतिडझनास एक हजार रुपये तर एक नंबर प्रतिच्या तीनशे ग्रॅम वजनाच्या हापूस आंब्यांचा दर १६०० रुपये डझन असल्याची माहिती पणन मंडळाचे देशांतर्गत व्यापार विकास विभागप्रमुख सुहास काळे यांनी दिली.

Navin Sandhya, 11/4/2026

# पणन मंडळामार्फत आंबा महोत्सवाचे पुण्यात आयोजन

**पुणे :** महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ व पुणे जिल्हा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' या संकल्पनेअंतर्गत पीएमटी बस डेपो शेजारी मार्केटयार्ड, पुणे येथे आंबा महोत्सव–२०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाचे उद्घाटन राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते ११ एप्रिल रोजी दुपारी १ वाजता करण्यात येणार आहे. या महोत्सवात रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, पालघर व ठाणे या कोकणातील जिल्ह्यांमधील जीआय मानांकन प्राप्त हापूस आंब्यासह केशर, पायरी व इतर वाणांचे आंबे उपलब्ध असणार आहेत.मार्केटयार्ड येथे सुमारे ६० स्टॉल्सद्वारे थेट विक्रीची व्यवस्था करण्यात आली असून शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना दर्जेदार आंबे वाजवी दरात मिळण्याचा उद्देश आहे. हा आंबा महोत्सव सलग २५ व्या वर्षी आयोजित करण्यात येत असून १० जून २०२६ पर्यंत सुरू राहणार आहे. ग्राहकांनी या महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन पणन मंडळाचे सरव्यवस्थापक विनायक कोकरे यांनी केले आहे.

# महाराष्ट्र स्टेट एग्रीकल्चरल मार्केटिंग बोर्ड ११ अप्रैल से पुणे के मार्केटयार्ड में मैंगो फेस्टिवल ऑर्गनाइज कर रहा है



**पुणे :** महाराष्ट्र स्टेट एग्रीकल्चरल मार्केटिंग बोर्ड हर साल 'प्रोड्यूसर टू कंज्यूमर डायरेक्ट सेल' के कॉन्सेप्ट के तहत आम उगाने वाले किसानों को आम की रिटेल बिक्री के लिए मैंगो फेस्टिवल ऑर्गनाइज़ करता है। राज्य में हापुस और केशर आम के प्रोडक्ट बनाने वाले किसान-एंटरप्रेन्योर बड़ी संख्या में आगे आ रहे हैं और अपने प्रोडक्ट को प्रमोट करने, कंज्यूमर्स में जागरूकता लाने, डायरेक्ट खरीद और मार्केट लिंकेज बनाने के मकसद से, महाराष्ट्र स्टेट एग्रीकल्चरल मार्केटिंग बोर्ड और पुणे जिला परिषद, पुणे ने १० अप्रैल से १० जून, २०२६ तक पुणे के मार्केट यार्ड, झचढ बस डिपो के पास में मैंगो फेस्टिवल-२०२६ ऑर्गनाइज़ किया है।

मैंगो फेस्टिवल का उद्घाटन शनिवार, ११ अप्रैल, २०२६ को दोपहर २:०० बजे होगा। यह इवेंट दोपहर १.०० बजे माननीय मार्केटिंग और प्रोटोकॉल राज्य मंत्री, श्री जयकुमार रावल करेंगे।

महाराष्ट्र स्टेट एग्रीकल्चरल मार्केटिंग बोर्ड हर साल प्रोड्यूसर-टू-कंज्यूमर के कॉन्सेप्ट के हिसाब से मैंगो फेस्टिवल ऑर्गनाइज़ करता है, जिसका मकसद आम बेचने के सिस्टम में बिचौलियों को खत्म करना और किसानों को सही दाम पर अच्छी क्वालिटी के आम दिलाना है। इस साल मार्केटिंग बोर्ड के मैंगो फेस्टिवल का लगातार २५वां साल है। एग्रीकल्चरल मार्केटिंग बोर्ड के एग्जीक्यूटिव डायरेक्टर श्री संजय कदम ने बताया कि इस फेस्टिवल में कोंकण के पांच जिलों रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगढ़, पालघर और ठाणे के हापुस आम के साथ-साथ राज्य के केशर, पायरी और दूसरी तरह के आम मिलेंगे। इस फेस्टिवल में मार्केट यार्ड में ६० स्टॉल लगाकर आम बेचे गए हैं।

इससे शहर के अलग-अलग हिस्सों से कस्टमर्स को आसानी होगी। यह फेस्टिवल १० जून तक चलेगा। हालांकि, मार्केटिंग बोर्ड के जनरल मैनेजर श्री विनायक कोकरे ने कस्टमर्स से अपील की है कि वे कोंकण के हाई क्वालिटी वाले हापुस आम के साथ-साथ राज्य के अलग-अलग हिस्सों से केशर आम का भी फायदा उठाएं।

Agrowon, 07/04/2026

# हिंगणघाट बाजार समिती देणार अनुदानावर पेरणी यंत्र

## सुमारे एक हजार शेतकऱ्यांना लाभ देण्याचे उद्दिष्ट

अॅग्रोवन वृत्तसेवा

हिंगणघाट, जि. वर्धा : शेतीतील वाढती मजुरी, मजुरांची टंचाई आणि बदलत्या हवामानामुळे उत्पादन खर्च वाढत असताना शेतीत यांत्रिकीकरणाचा वेग वाढवण्याच्या दृष्टीने हिंगणघाट बाजार समितीने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. समितीमार्फत तालुक्यातील शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदानावर पेरणी यंत्र उपलब्ध करून देण्यात येणार असून, या योजनेअंतर्गत सुमारे १ हजार शेतकऱ्यांना लाभ देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

समितीचे सभापती अॅड. सुधीर कोठारी यांनी दिलेल्या माहितीनुसार, शेतकऱ्यांचे उत्पादन खर्च कमी करून वेळेवर पेरणी व्हावी यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. वाढत्या मजुरी दरामुळे वेळेत पेरणी न झाल्यास उत्पादनावर होणारा परिणाम लक्षात घेऊन यांत्रिकीकरणाला चालना देणे आवश्यक ठरत आहे. त्यासाठीच बाजार समितीने अनुदानावर पेरणी यंत्र पुरवठा करण्याचा पुढाकार घेतला आहे. समितीमार्फत पुरवण्यात येणारी पेरणी यंत्रे नामांकित कंपन्यांची असून, या यंत्रांद्वारे कापूस, सोयाबीन, तूर, हरभरा, गहू, मूग, तीळ यांसारख्या विविध पिकांची अचूक व जलद पेरणी करता येणार आहे. यामुळे शेतकऱ्यांचा वेळ व मजुरी खर्च दोन्ही वाचणार असून उत्पादनक्षमतेतही वाढ होण्याची अपेक्षा आहे. या योजनेत प्राधान्याने अल्प व मध्यम भूधारक शेतकऱ्यांचा समावेश करण्यात येणार आहे. प्रत्येक कुटुंबास एक यंत्र देण्याचे नियोजन असून, एकूण एक हजार यंत्रांचा टप्प्याटप्प्याने पुरवठा केला जाणार आहे. यामुळे तालुक्यातील शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढण्यास मदत होईल.



### २ एप्रिलपासून अर्ज स्वीकृती सुरू

दरम्यान, या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी २ एप्रिलपासून अर्ज सादर करणे सुरू केले असून, एप्रिल अखेरपर्यंत अर्ज स्वीकृती केली जाणार आहे. अर्जासोबत सातबारा, आधार कार्ड, रेशन कार्ड, बाजार समितीत शेतीमाल विक्रीची पावती आदी कागदपत्रे आवश्यक आहेत. अर्जाची छाननी करून पात्र लाभार्थ्यांची निवड करण्यात येणार असल्याचे समितीकडून स्पष्ट करण्यात आले. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना आधुनिक यंत्रसामग्री सहज उपलब्ध होणार असून, मजुरीवरील अवलंबित्व कमी होऊन उत्पादनात वाढ होण्यास चालना मिळणार आहे.

Agrowon, 01/04/2026

# सांगली जिल्ह्यातून नऊ हजार टन द्राक्षाची निर्यात

## २१ देशांत पाठविले ६६४ कंटेनर; पंधरा दिवसांत निर्यात हंगाम संपणार

ॲग्रोवन वृत्तसेवा

सांगली : जिल्ह्यातील द्राक्ष निर्यातीचा हंगाम अंतिम टप्प्यात आला आहे. मात्र यंदा निर्यातीचा हंगाम सुरू झाल्यापासून निर्यातीला फारशी गती नसल्याचे चित्र आहे. जिल्ह्यातून आजअखेर युरोपियन देशांसह आखाती देशांत



६६४ कंटेनर म्हणजे ८ हजार ९५४ टन द्राक्षाची निर्यात झाली आहे. गतवर्षी अतिवृष्टीचा फटका द्राक्ष पिकाला बसला आहे. त्यामुळे यंदा निर्यात घटणार आहे.

गतवर्षी मे महिन्यापासून सुरू झालेला पाऊस आणि त्यानंतर संततधार, अतिवृष्टीचा फटका पिकाला बसला. त्यामुळे फळ छाटणीचे नियोजन विस्कळीत झाले. या साऱ्याचा परिणाम द्राक्ष निर्यातीच्या नोंदणीवर झाला. जिल्ह्यातून यंदाच्या हंगामात द्राक्ष निर्यातीसाठी ८ हजार ३५६ शेतकऱ्यांनी ४ हजार ४३५ हेक्टरवरील निर्यात करण्यासाठी द्राक्ष बागेची नोंदणी केली.

जिल्ह्यातील डिसेंबर द्राक्ष निर्यात सुरू झाली. यंदाच्या हंगामात जिल्ह्यातून प्रामुख्याने नेदरलँड्स, युनायटेड किंग्डम, संयुक्त अरब अमिराती यासह अठरा देशांत जिल्ह्यातील द्राक्ष पोहोचली आहेत. गतवर्षी जिल्ह्यातून १० हजार १६५ शेतकऱ्यांनी युरोपियनसह आखाती देशांत १७ हजार ८९७ टन द्राक्षाची निर्यात केली होती.

यंदाच्या हंगामात जिल्ह्यातून युरोपियन देशात ५२२ कंटेनर म्हणजे ६ हजार ८२४ टन द्राक्षाची निर्यात झाली आहे. जिल्ह्यातील द्राक्ष निर्यातीचा द्राक्षाचा हंगाम अंतिम टप्प्याकडे पोहोचला आहे. पंधरा दिवस निर्यात सुरू राहील, असा अंदाज कृषी विभागाने व्यक्त केला आहे. वास्तविक पाहता गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदाच्या हंगामात द्राक्षाची निर्यात घटेल.

### युद्धाची निर्यातीला झळ

मध्य पूर्वेत सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीची झळ द्राक्ष उद्योगाला बसली आहे. आखाती देशातील प्रमुख बाजारपेठांकडे होणारी द्राक्ष निर्यात मंदावली होती. अशा परिस्थितीतही जिल्ह्यातून आखाती देशात द्राक्षाची निर्यात हळूहळू सुरू आहे. जिल्ह्यातून आखाती देशातील कुवेत, ओमन, कतार, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती या देशांत १४२ कंटेनर म्हणजे २१३०.८५ टन द्राक्षाची निर्यात झाली आहे.